

कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी





श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, संचालित

# संगमेश्वर कॉलेज सोलापूर

# प्रतिभासंगम

वर्ष तिसरे । अंक ९ वा । ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२

श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी संचलित...
संगमेश्वर कॉलेज,सोलापूर




प्रेरणास्थान

# प्रतिभासंगम

**संपादक** – धर्मराज काडादी

**सहसंपादक** - प्रा. संतोष पवार
प्रा. शिवराज पाटील

**समन्वय समिती –**
प्राचार्य डॉ.राजेंद्र देसाई
उपप्राचार्य प्रसाद कुंटे
प्रा. एस. डी. गोठे

**मुखपृष्ठ –** सचिन क्षीरसागर (विराक्षी)

**सजावट व मांडणी –** प्रदीप कोडगीमठ
रामचंद्र कुलकर्णी

**मुद्रक प्रकाशक -**
कल्पकला प्रिंटिंग प्रेस,
होटगी रोड, सोलापूर.

**संपर्क** – 0217/2600481 /82
**ई–मेल –**
pratibhasangam@sangameshwarcollege.in
**वेबसाईट** -www.sangameshwarcollege.in

## अंतरंग...

विद्यार्थ्यांनी आपल्या वेळेचा सदुपयोग केला पाहिजे. आपल्या मोकळ्या वेळेत शिक्षकांकडून मार्गदर्शन घ्यावे. आपल्या देनंदिनीचे टाईमटेबल बनवून वेळेचा सदुपयोग केल्याने यश नक्कीच मिळतो. विद्यार्थ्यांनी वेळेचे भान राखून आपल्या लक्षाचे निर्धारण करावे.काही लोक त्यांच्या पैशाला वेळेपेक्षा जास्त महत्त्व देतात, तथापि, सत्य हे आहे की वेळेपेक्षा अधिक मौल्यवान काहीही नाही. 3

देशभरात एनसीसीचा अमृत महोत्सव अर्थात 75 वा वर्धापन दिन साजरा होत आहे. प्रतिवर्षी नोव्हेंबर महिन्याच्या चौथ्या रविवारी एनसीसी दिवस साजरा असतो. संपूर्ण देशात महारक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त ) ९ महाराष्ट्र बटालियन एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. यामध्ये ८२ विद्यार्थी आणि २६ विद्यार्थिनींचा समावेश होता.एकूण १०८ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. 13

"महाविद्यालयीन जीवनात विज्ञान विश्वातील अगाध ज्ञानाचा अभ्यास करत समाजहिताचे संशोधक व्हा. त्यासाठी विज्ञान विषयांची पुस्तके वाचा. संशोधकांच्या कार्याची माहिती जाणून घ्या. त्यांचे संशोधन कार्यातील कष्ट आणि एकाग्रता यांचा अभ्यास करा. त्याचा आपल्याला भावी आयुष्यात उपयोग होतो." असे प्रतिपादन सुलभा वठारे यांनी केले. 16

विज्ञान विश्वकल्याणासाठी हे ब्रीद घेऊन विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन प्रतिवर्षी केले जाते. यामध्ये १०० प्रयोगांचे संच यामध्ये सहभागी झाले होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य यांनी केले. नागेश कोल्हे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांनी जगभरातील वैज्ञानिक शोध आणि शास्त्रज्ञांचे किस्से सांगत विद्यार्थ्यांचे मनोरंजन करत उद्बोधन केले. 21

संगमेश्वर कॉलेज स्वायत्त कनिष्ठ विभागाच्या भाषा संकुलाच्या वतीने आयोजित मराठी, हिंदी, इंग्रजी, कन्नड, संस्कृत या पाच भाषांमधील अभिवाचन सुलेखन स्पर्धेस उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. यात शहरातील विविध महाविद्यालयातील ५१० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. अभिवाचनासाठी पाठ्यपुस्तकातील आपल्या आवडीची कथा-कविता, गद्य उतारा निवडण्यास विद्यार्थ्यांना संधी दिली होती . 23

# महाविद्यालयीन जीवनात वेळेचे नियोजन महत्त्वाचे आहे
## - फुलसिंग पवार

**सोलापूर प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी आपल्या वेळेचा सदुपयोग केला पाहिजे. आपल्या मोकळ्या वेळेत शिक्षकांकडून मार्गदर्शन घ्यावे. आपल्या देनंदिनीचे टाईमटेबल बनवून वेळेचा सदुपयोग केल्याने यश नक्कीच मिळतो. विद्यार्थ्यांनी वेळेचे भान राखून आपल्या लक्षाचे निर्धारण करावे.

काही लोक त्यांच्या पैशाला वेळेपेक्षा जास्त महत्त्व देतात, तथापि, सत्य हे आहे की वेळेपेक्षा अधिक मौल्यवान काहीही नाही. हीच वेळ आहे जी आपल्याला संपत्ती, समृद्धी आणि आनंद देते. जगात सर्व काही विकत घेऊ शकतो पण वेळ कोणीही विकत घेऊ शकत नाही. काही लोक असे आहेत जे आपला वेळ वाया घालवत आहे. आपण काय करत आहोत, कसं करत आहोत. याचा विचार देखील करत नाही. विद्यार्थी जीवनात वेळेचा योग्य वापर केला तर जीवनात यश नक्कीच मिळते.

असे प्रतिपादन मुंबईचे सहाय्यक पोलीस आयुक्त फुलसिंग पवार यांनी केले. ते संगमेश्वर महाविद्यालय मध्ये टाईम मॅनेजमेंट या विषयावर आयोजित केलेल्या व्याख्यानात बोलत होते. याप्रसंगी उपप्राचार्य प्रसाद कुंटे, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे यांच्यासह शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.





**क्षेत्रभेटी अंतर्गत  इयत्ता अकरावी, बारावी विज्ञान शाखेची सहल  NDA (नॅशनल डिफेन्स अकॅडमी ) पुणे  येथे अभ्यास सहलीसाठी गेली होती. त्याची क्षणचित्रे...**






**क्षेत्रभेटी अंतर्गत इयत्ता अकरावी, बारावी विज्ञान शाखेची सहल NDA (नॅशनल डिफेन्स अकॅडमी ) पुणे येथे अभ्यास सहलीसाठी गेली होती. त्याची क्षणचित्रे...**







**इयत्ता अकरावी बारावी वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी (इंडस्ट्रियल व्हिजीट ) औद्योगिक क्षेत्र भेटी अंतर्गत ' दूध पंढरी ' या सोलापूर जिल्हा दूध संघाच्या प्रक्रिया केंद्रास भेट देण्यात आली**




**इयत्ता अकरावी बारावी वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी (इंडस्ट्रियल व्हिजीट ) औद्योगिक क्षेत्र भेटी अंतर्गत ' विक्रांत ग्लास ' या ग्लास उद्योग केंद्रास भेट देण्यात आली होती.**





## (इंडस्ट्रियल व्हिजीट )
## औद्योगिक क्षेत्र भेटी अंतर्गत क्षणचित्रे






# (इंडस्ट्रियल व्हिजीट )

**औद्योगिक क्षेत्र भेटी अंतर्गत सहकार क्षेत्रातील श्री स्वामी समर्थ सहकारी सूतगिरणी नियमित वळसंग या सूतगिरणीला भेट देण्यात आली आणि तिथल्या कामकाजाची माहिती ,प्रक्रिया उद्योगाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली**








**कोविड-19 च्या प्रतिबंधासाठी महाविद्यालयात महापालिका आरोग्य विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना अधिक 2 सर आणि वरिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 15 ते 18 या वयोगटातील पहिले आणि दुसऱ्या लसीकरणाचे आयोजन करण्यात आले होते**






**सामाजिक न्याय व विशेष सहाय्यता विभाग महाराष्ट्र शासन यांच्या वतीने जात वैधता प्रमाणपत्र शिबिर कॉलेजमध्ये घेण्यात आले याप्रसंगी विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.**

महाराष्ट्र शासन





सोलापूर जिल्हा प्रशासन निवडणूक शाखेच्या वतीने मतदार नोंदणी अभियान कॉलेजमध्ये घेण्यात आले, या अंतर्गत विद्यार्थ्यांनी आपली नावे मतदार यादीत नोंदवली.










पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर, विद्यार्थी कल्याण मंडळ आयोजित

**युवा महोत्सव 2022**

मध्ये संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त) च्या संघाला

**सर्वसाधारण उपविजेतेपद**

अर्थात दुसरा क्रमांक मिळाल्याबद्दल संघाचे

# मनःपूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा !!!

संचार

संचार | संमिश्र | सोलापूर, गुरुवार, १७ नोव्हेंबर २०२२ | ७

# 'एकदम कडक'चे 'संगमेश्वर'मध्ये प्रमोशन

संचार प्रतिनिधी

▶ सोलापूर, दि. १६- दोन गावातल्या पाणी प्रश्नावर आधारित, विनोदी अंगाने धमाल उडवून देणारा 'एकदम कडक' हा चित्रपट येत्या २ डिसेंबरला महाराष्ट्रातल्या सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. त्यानिमित्ताने नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला. त्यानंतर या चित्रपटातील कलाकारांनी संगमेश्वर कॉलेजच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. 'सैराट'फेम अरबाज शेख, बबन चित्रपटातील गायत्री जाधव, प्रांजली कंझारकर या कलाकारांनी संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त) मध्ये उपस्थिती लावत प्रमोशन केले. प्रारंभी कॉलेजच्यावतीने प्र. प्राचार्य राजेंद्र देसाई यांनी कलाकारांचे स्वागत केले. सांस्कृतिक विभागप्रमुख दादासाहेब खांडेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. संतोष पवार यांनी कलाकारांशी संवाद साधला.



'सैराट चित्रपटातील संवाद, गाणी, कथानक ज्याप्रमाणे आहेत त्याचप्रमाणे एक वेगळा लहेजा घेऊन 'एकदम कडक' हा चित्रपट रसिकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटातील संवाद तितक्याच वेगळ्या ढंगाने आपल्याला पाहायला मिळतील. पाण्यासाठी भांडणाऱ्या चिकणी आणि देखणी या गावातील गोष्ट या चित्रपटात येते. गावात शहरी वातावरण नसताना गावातली स्विटी मुंबईत वाढते आणि गावात येऊन गावातल्या मुलांना प्रेम शिकवते. त्यातून होणाऱ्या गमतीजमती पाहण्यासाठी चित्रपटगृहात जावे लागेल, असे याप्रसंगी साधलेल्या संवादात कलाकारांनी सांगितले.

शुभम फिल्म प्रॉडक्शन प्रस्तुत या चित्रपटात पार्थ भालेराव, तानाजी गळगुंडे, अरबाज शेख, चिन्मय संत, भाग्यश्री मोटे, गायत्री जाधव, प्रांजली कंझारकर, जयश्री सोनुने, शशांक शेंडे, माधव अभ्यंकर, मिलिंद दास्ता, रुक्मिणी सुतार यांच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटातील गाण्यांसाठी सायली पंकज, सौरभ साळुंखे, अवधूत गुप्ते आणि उमेश गवळी यांनी गायन केले आहे. निर्माता- शेखर मते, दिग्दर्शक- गणेश शिंदे, पटकथा लेखक कल्पेश जगताप, संगीत दिग्दर्शन- नरेंद्र भिडे, पंकज पडघम यांचे तर छायांकन- बाबा लाड यांचे आहे.

प्रमोशनसाठी मुंबईच्या टीमने सहकार्य केले. सुजित काळे यांनी समन्वय साधला. याप्रसंगी कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी प्रचंड गर्दी केली होती. उपप्राचार्य प्रा. डी. एम. मेत्री, प्रा. डॉ. सुहास पुजारी, प्रा. डॉ. संघप्रकाश दुडडे आदी उपस्थित होते.

# पक्षी सप्ताहनिमित्त आयोजित निबंध, चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण



संचार प्रतिनिधी

**सोलापूर, दि. १६-** पक्षी सप्ताहनिमित्त येथील वनविभागाच्यावतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय निबंध व चित्रकला स्पर्धेत संगमेश्वर महाविद्यालयाच्या सहा विद्यार्थ्यांनी पारितोषिके पटकाविली.

निबंध स्पर्धेत संगमेश्वरच्या प्राणिशास्त्र विभागातील अदिती चव्हाण, साक्षी सर्वगोड, स्नेहा चोपडे तर चित्रकला स्पर्धेत प्रतीक्षा म्हमाणे, समर्थ सोनकटले व विश्वास नागेनूर यांनी यश मिळविले.

पक्षी सप्ताहानिमित्त संगमेश्वर महाविद्यालय प्राणिशास्त्र विभागातील बीएस्सी भाग-१ व भाग-३ मधील ९४ विद्यार्थ्यांनी सिध्देश्वर वनविहाराला भेट दिली. यावेळी वनविभागाच्यावतीने स्वागत करण्यात आले. वनपरिक्षेत्र अधिकारी दीपक खलाने, वनसंरक्षक श्रीशैल पाटील, वनपाल शंकर कुताटे यांनी विद्यार्थ्यांना वन्यप्राण्यांबद्दलची माहिती दिली.

नेचर कॉन्झर्व्हेशनचे अध्यक्ष भरत छेडा, जाधव, अनिल आलदर यांनी विद्यार्थ्यांना पक्ष्यांविषयी मार्गदर्शन केले. राहुल शिंदे यांनी विषारी व बिनविषारी सापांबद्दल उद्‌बोधन केले. ॲनिमल राहतचे डॉ. आकाश जाधव यांनी जखमी पक्ष्यांचे उपचार व हाताळणी याविषयी माहिती दिली.

यावेळी प्राणिशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. एम. बी. बगले, प्रा. डॉ. एस. एस. पाटील, प्रा. डॉ. एस. बी. दामा, प्रा. डॉ. एस. जे. बेळगुंपे तसेच एम. यू. मंद्रूपकर, आर. एस. कोळी, विनायक सारंगमठ उपस्थित होते.

# संगमेश्वरच्या ९ महाराष्ट्र बटालियनच्या १०८ विद्यार्थ्यांनी केले रक्तदान

## एनसीसीच्या वर्धापनदिनी महारक्तदानाला तरुणांचा उस्फुर्त प्रतिसाद



**सोलापूर प्रतिनिधी ( दिनांक २६ )** देशभरात एनसीसीचा अमृत महोत्सव अर्थात 75 वा वर्धापन दिन साजरा होत आहे. प्रतिवर्षी नोव्हेंबर महिन्याच्या चौथ्या रविवारी एनसीसी दिवस साजरा असतो. संपूर्ण देशात महारक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त ) ९ महाराष्ट्र बटालियन एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. यामध्ये ८२ विद्यार्थी आणि २६ विद्यार्थिनींचा समावेश होता.एकूण १०८ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.दमाणी रक्तपेढीच्या सहकार्याने रक्त संकलन झाले. या शिबीराचे उद्घाटन श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन पुष्पराज काडादी यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी प्र.प्राचार्य राजेंद्र देसाई, उपप्राचार्य प्रसाद कुंटे, मेजर चंद्रकांत हिरतोट, शिल्पा लब्बा यांची उपस्थिती होती.



# संगमेश्वरच्या ९ महाराष्ट्र बटालियनच्या १०८ विद्यार्थ्यांनी केले रक्तदान ...



उद्घाटनाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिरतोट यांनी केले, त्यानंतर द्विशतकवीर रक्तदाते अशोक न्हावरे यांचा कॉलेजच्या वतीने सत्कार झाला. प्रमुख पाहुणे पुष्पराज काडादी यांनी मनोगत व्यक्त केले . ते म्हणाले की ,'' सर्वप्रथम शहीद शहिदांना विनम्र अभिवादन करतो .आजच्या संविधान दिनाच्या निमित्ताने शुभेच्छा देतो आणि एनसीसीच्या वतीने महा रक्तदान शिबिर आयोजित केले आहे त्यामध्ये उस्फुर्त सहभाग विद्यार्थ्यांना शुभेच्छा देतो आणि त्यांचे अभिनंदन करतो "

याप्रसंगी कमांडिंग ऑफिसर कर्नल राजा माझी, प्रशासकीय ऑफिसर कर्नल अनिल वर्मा, सुभेदार मेजर गनबहादुर गुरुंग, सुभेदार व्यंकट गोमसाळे, बीएचएम युवराज कापसे,तुकाराम साळुंके ,संतोष पवार यांच्यासह ,प्राध्यापक, शिक्षक, आणि एनसीसीचे विद्यार्थी, रक्तपेढीचे डॉ.अमरजा थिटे ,कर्मचारी उपस्थित होते.

# शुक्रवार विशेष

## श्री सिद्धेश्वर राज्यस्तरीय भव्य कृषी प्रदर्शन
### याविषयी चर्चात्मक कार्यक्रम

सहभाग - श्री सिद्धेश्वर देवस्थान यात्रा समितीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, कृषी प्रदर्शन समितीचे प्रमुख गुरुराज माळगे आणि आत्माचे निवृत्त कृषी उपसंचालक विजयकुमार बरबडे



शुक्रवार दि. 23 डिसेंबर 2022 रोजी सकाळी 10.30 वाजता...
नक्की ऐका... FM Band 103.4 आकाशवाणी सोलापूर केंद्रावरून
तसेच news on air या प्रसार भारतीच्या app वरून जगभरातील श्रोत्यांसाठी

संवादक - अभिराम सराफ
सादरकर्ते - राजेंद्र दासरी



संगमेश्वरच्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत हि.ने.कॉमर्स कॉलेजचा संघ विजेता ठरला.याप्रसंगी संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे व्यवस्थापन समिती सदस्य शरणराज काडादी, प्र.प्राचार्य राजेंद्र देसाई, उपप्राचार्य प्रसाद कुंटे, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे, विभाग प्रमुख बसय्या हणमगाव आदी.

# विज्ञान विश्वातील अगाध ज्ञानाचा अभ्यास करत समाजहिताचे संशोधक व्हा - सुलभा वठारे

## विज्ञान केंद्र व संगमेश्वर कॉलेजच्या वतीने जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन



"महाविद्यालयीन जीवनात विज्ञान विश्वातील अगाध ज्ञानाचा अभ्यास करत समाजहिताचे संशोधक व्हा. त्यासाठी विज्ञान विषयांची पुस्तके वाचा. संशोधकांच्या कार्याची माहिती जाणून घ्या. त्यांचे संशोधन कार्यातील कष्ट आणि एकाग्रता यांचा अभ्यास करा. त्याचा आपल्याला भावी आयुष्यात उपयोग होतो." असे प्रतिपादन सुलभा वठारे यांनी केले. त्या विज्ञान केंद्र आणि संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभाग आयोजित जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी सचिव धर्मराज काडादी,प्र.प्राचार्य डॉ.राजेंद्र देसाई, चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य दीपक पाटील, सोलापूर सायन्स सेंटरचे क्युरेटर राहुल दास, उपप्राचार्य प्रसाद कुंटे, चित्रकार विठ्ठल मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.



# विज्ञान केंद्र व संगमेश्वर कॉलेजच्या वतीने जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन ...




प्रारंभी सरस्वती पूजन करून उद्घाटन झाले. त्यानंतर कृषी, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, जीवशास्त्र, संगणक, गणित, खगोलशास्त्र या विभागातून विद्यार्थ्यांच्या मॉडेल चे सादरीकरण झाले. दोन दिवसीय प्रदर्शनात ८५ संच विद्यार्थ्यांनी मांडले आहेत. विभाग प्रमुख रामराव राठोड . चंद्रकांत हिरतोट, बाळकृष्ण कापसे,शुभदा कुलकर्णी ,लीना खमितकर, प्रशांत शिंपी, स्मिता शिंदे, प्रशांत पाटील, सिद्धाराम विजापुरे, प्राजक्ता चव्हाण, सुषमा पाटील, तुकाराम साळुंखे, रोहन डोंगरे, अभिजीत निवर्गीकर, विशाल जत्ती, संगमेश्वर स्वामी, शंकर शितल, स्नेहल खैरे, अश्विनी वाघमारे, मानसी काळे, शिल्पा लबा, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



## संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभाग आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या आवारातच कर्मयोगी कै. अप्पासाहेब कडादी चित्रकला महाविद्यालयाच्या वतीने चित्र प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं होतं त्याप्रसंगीची काही क्षणचित्रे...











# विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमासोबत संशोधनात गोडी निर्माण करावी - डॉ. सुनील विभुते

## संगमेश्वरच्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात पार्वती धत्तरगी प्रथम






''विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमासोबत संशोधनात गोडी निर्माण करावी त्यातून विज्ञान क्षेत्रात उत्तम करिअर घडण्यास मदत होते. विज्ञान शिक्षकांनी संशोधन क्षेत्रातील अनुभव विद्यार्थ्यांना द्यावेत.'' असे प्रतिपादन बार्शीचे **विज्ञान लेखक सुनील विभुते** यांनी केले. ते विज्ञान केंद्र आणि संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभाग आयोजित जिल्हा स्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. याप्रसंगी प्र. डॉ.राजेंद्र देसाई, उपप्राचार्य प्रसाद कुंटे,पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे, परीक्षक संगीता सातवेकर ,सुनिता कुलकर्णी उपस्थित होते.



# संगमेश्वरच्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात पार्वती धत्तरगी प्रथम




**संगमेश्वरच्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात पार्वती धत्तरगी प्रथम त्याप्रसंगी विजेते विद्यार्थी आणि प्रमुख पाहुणे बार्शीचे विज्ञान लेखक डॉ.सुनील विभुते , प्र.प्राचार्य डॉ.राजेंद्र देसाई, उपप्राचार्य प्रसाद कुंटे,पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे, परीक्षक संगीता सातवेकर ,सुनिता कुलकर्णी.**



निकाल याप्रमाणे- प्रथम क्रमांक - पार्वती धत्तरगी (संगमेश्वर कॉलेज रुपये ३००१) द्वितीय क्रमांक - देव देसाई, अभिषेक माळगे ( संगमेश्वर कॉलेज, रुपये २००१ ) तृतीय क्रमांक- मयूर निलंगे, साक्षी जावळे ( गांधींनाथा रंगजी महाविद्यालय, रुपये १००१ ) उत्तेजनार्थ - शंकर बिरजनवार, विजयालक्ष्मी दीक्षित, प्रणव कांबळे, समर्थ तळणीकर, मंथन कांबळे, समृद्धी वाकसे, आरुष बंगारी, श्रुतिका साखरे, गायत्री गंधारे ( ह. दे. कनिष्ठ महाविद्यालय ) सिद्धी जोडभावी, गायत्री गांगर ,साक्षी करजगीकर, नागेश्वरी रुपनर, नीलंबिका साबणे, समर्थ अक्कलकोटे, रितेश गुंड, चंद्रशेखर रामपुरे, स्वप्निल बसर्गी.






विज्ञान विश्वकल्याणासाठी हे ब्रीद घेऊन विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन प्रतिवर्षी केले जाते. यामध्ये १०० प्रयोगांचे संच यामध्ये सहभागी झाले होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य यांनी केले. नागेश कोल्हे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांनी जगभरातील वैज्ञानिक शोध आणि शास्त्रज्ञांचे किस्से सांगत विद्यार्थ्यांचे मनोरंजन करत उद्बोधन केले.प्रियंका पाटील यांनी निकाल जाहीर केले.प्रत्येकी रोख रक्कम प्रमाणपत्र देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

याप्रसंगी विज्ञान शाखेतील रामराव राठोड, चंद्रकांत हिरतोट, बाळकृष्ण कापसे,शुभदा कुलकर्णी , प्रशांत शिंपी, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे , विज्ञान प्रदर्शन समन्वयक विश्वजीत आहेरकर , रोहन डोंगरे, स्मिता शिंदे, प्रशांत पाटील, सिद्धाराम विजापुरे, प्राजक्ता चव्हाण, सुषमा पाटील, तुकाराम साळुंखे, अभिजीत निवर्गीकर, विशाल जत्ती, संगमेश्वर स्वामी, शंकर शितल, स्नेहल खैरे, अश्विनी वाघमारे, मानसी काळे, शिल्पा लब्बा, बार्शीहून निशिगंध झाडबुके, सुनील लुंगारे ,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.सूत्रसंचालन लीना खमितकर यांनी केले तर आभार रूपाली अंबुलगे यांनी मानले.

# संगमेश्वरच्या अभिवाचन, सुलेखन स्पर्धेस उस्फुर्त प्रतिसाद

## कनिष्ठ महाविद्यालयातील भाषा संकुलाचा अभिनव उपक्रम



**सोलापूर प्रतिनिधी**

संगमेश्वर कॉलेज स्वायत्त कनिष्ठ विभागाच्या भाषा संकुलाच्या वतीने आयोजित मराठी, हिंदी, इंग्रजी, कन्नड, संस्कृत या पाच भाषांमधील अभिवाचन सुलेखन स्पर्धेस उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. यात शहरातील विविध महाविद्यालयातील ५१० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. अभिवाचनासाठी पाठ्यपुस्तकातील आपल्या आवडीची कथा-कविता, गद्य उतारा निवडण्यास विद्यार्थ्यांना संधी दिली होती .तीन मिनिटांच्या अवधीत विद्यार्थ्यांनी नाट्य उतारा, नामवंत साहित्यिकांच्या कथा-कादंबऱ्या यामधील उतारे, कविता, स्वरचित कविता, प्रबोधनपर लेख, विनोदी उतारे सादर करून उपस्थितांची माने जिंकली. शुद्ध आणि सुंदर हस्ताक्षर हे उत्तम व्यक्तिमत्त्वाचे लक्षण असल्याने त्याचा विकास व्हावा या उद्देशाने सुलेखन स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत विद्यार्थ्यांचे रेखीव लेखन पहावयास मिळाले. प्रारंभी सरस्वती पूजन पर्यवेक्षक उषा जमादार, संघप्रकाश दुड्डे (हिंदी विभागप्रमुख) डॉ. नानासाहेब गव्हाणे, संस्कृतचे सौ व श्री सचिन सवाई डॉ.शिवानंद तडवळ ( कन्नड विभागप्रमुख, पु.अ. हो.सो. विद्यापीठ ) मल्लिनाथ साखरे, शिवराज पाटील या मान्यवर आणि परीक्षकांच्या शुभहस्ते झाले. त्यानंतर कोमल कोंडा यांनी परीक्षकांचा परिचय करून दिला. ''उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना भाषेचा लळा लागावा यासाठी विद्यार्थीकेंद्री हा उपक्रम आहे''. असे प्रतिपादन उद्घाटन सत्रात बोलताना प्र. प्राचार्य डॉ.राजेंद्र देसाई यांनी केले तर उपप्राचार्य प्रसाद कुंटे यांनी वैविध्यपूर्ण भाषेचे आकलन झाल्याने व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो असे सांगितल









याप्रसंगी मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ.सुहास पुजारी यांच्यासह भाषा संकुलातील प्रा. अशोक निंबर्गी, प्रा.तानाजी घाडगे, प्रा.सायबण्णा निम्बर्गी, डॉ.गणेश मुडेगावकर, प्रा. शिवराज देसाई, प्रा.प्रदीप आर्य, प्रा.सविता पाटील, प्रा.संतोष पवार यांच्यासह प्रा.चंद्रकांत जाधव, प्रा.विद्या अर्जुनसोंडकर, प्रा.प्राची कुंटे, प्रा.लता यादव आदी उपस्थित होते. प्रा.अनिता अलकुंटे, प्रा.तेजश्री तळे यांनी सूत्रसंचालन केले. तर प्रा.मल्लिकार्जुन पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले. संतोष फुलारी, रायगोंडा हत्ताळी यांनी स्पर्धेसाठी सहाय्य केले. प्रमुख पाहुण्यांच्या शुभेच्छा नंतर विविध विषय निहाय गटातून या स्पर्धा संपन्न झाल्या.

# संगमेश्वरच्या वाणिज्य प्रश्नमंजुषा स्पर्धेत हि.ने.कॉमर्स कॉलेजचा संघ विजेता

## प्रश्नमंजुषा स्पर्धेतून वाणिज्य क्षेत्रातील संधींची ओळख होते. - विश्वशंकर चाकोते



**सोलापूर प्रतिनिधी** -'वाणिज्य शाखेतील प्रश्नमंजुषा स्पर्धेमधून वाणिज्य क्षेत्रातील वैविध्यपूर्ण संधींची ओळख होते असे प्रतिपादन विश्व शंकर चाकोते यांनी केलं''. ते संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभाग वाणिज्य शाखेच्या वतीने आयोजित प्रश्नमंजुषा स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी बोलत होते.वाणिज्य क्षेत्रातील कौशल्य आणि तंत्र आत्मसात करता यावे या हेतूने प्रतिवर्षी संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभागाच्या वतीने बिझनेस क्विझचे आयोजन केले जाते. यात शहरातील कनिष्ठ महाविद्यालयाचे 290 विद्यार्थी सहभागी झाले होते. याप्रसंगी मंचावर संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे व्यवस्थापन समिती सदस्य शरणराज काडादी, प्र.प्राचार्य राजेंद्र देसाई, उपप्राचार्य प्रसाद कुंटे, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे, विभाग प्रमुख बसय्या हणमगाव आदी मान्यवर उपस्थित होते.

निकाल याप्रमाणे- प्रथम - अजिंक्य भुतडा, मोहित तोष्णीवाल ( हि.ने.कॉमर्स कॉलेज) द्वितीय - यशराज तारापुरे, समर्थ स्वामी - (संगमेश्वर कॉलेज ) तृतीय - वैष्णवी पानमुरी,पंकज क्षीरसागर - ( डी. ए. वेलणकर ) उतेजनार्थ - सिद्धू जाधव , साहिल पठाण ( छ. शिवाजी डे अँड नाईट कॉलेज ) संतोष क्षीरसागर,अर्पिता कांबळे ( उमाबाई श्राविका कनिष्ठ महाविद्यालय).

याप्रसंगी परीक्षक म्हणून शिवराज देसाई, डॉ. गणेश मुडेगावकर, डॉ.एस.आर.नाईक यांच्यासह शिवराज पाटील, तानाजी घाडगे,सायबण्णा निंबर्गी, दत्तात्रय गुड्डेवाडी, संतोष पवार, बाबासाहेब सगर, डॉ.अविनाश जम्मा,रवींद्र बिराजदार, निनाद सपकाळ, निखिल काळे, संगीता म्हमाणे आदी उपस्थित होते. गौरव जुदगार,तेजश्री तळे,मल्लिकार्जुन पाटील, माधव जोशी, रुपाली पाटील,राज मळेवाडी यांनी स्पर्धेचे सूत्रसंचालन यांनी केले.

# संगमेश्वरच्या वाणिज्य प्रश्नमंजुषा स्पर्धेत हि.ने.कॉमर्स कॉलेजचा संघ विजेता

## प्रश्नमंजुषा स्पर्धेतून वाणिज्य क्षेत्रातील संधींची ओळख होते. - विश्वशंकर चाकोते



**सोलापूर प्रतिनिधी** -'वाणिज्य शाखेतील प्रश्नमंजुषा स्पर्धेमधून वाणिज्य क्षेत्रातील वैविध्यपूर्ण संधींची ओळख होते असे प्रतिपादन विश्व शंकर चाकोते यांनी केलं''. ते संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभाग वाणिज्य शाखेच्या वतीने आयोजित प्रश्नमंजुषा स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी बोलत होते.वाणिज्य क्षेत्रातील कौशल्य आणि तंत्र आत्मसात करता यावे या हेतूने प्रतिवर्षी संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभागाच्या वतीने बिझनेस क्विझचे आयोजन केले जाते. यात शहरातील कनिष्ठ महाविद्यालयाचे 290 विद्यार्थी सहभागी झाले होते. याप्रसंगी मंचावर संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे व्यवस्थापन समिती सदस्य शरणराज काडादी, प्र.प्राचार्य राजेंद्र देसाई, उपप्राचार्य प्रसाद कुंटे, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे, विभाग प्रमुख बसय्या हणमगाव आदी मान्यवर उपस्थित होते.

निकाल याप्रमाणे- प्रथम - अजिंक्य भुतडा, मोहित तोष्णीवाल ( हि.ने.कॉमर्स कॉलेज) द्वितीय - यशराज तारापुरे, समर्थ स्वामी - (संगमेश्वर कॉलेज ) तृतीय - वैष्णवी पानमुरी,पंकज क्षीरसागर - ( डी. ए. वेलणकर ) उतेजनार्थ - सिद्धू जाधव , साहिल पठाण ( छ. शिवाजी डे अँड नाईट कॉलेज ) संतोष क्षीरसागर,अर्पिता कांबळे (उमाबाई श्राविका कनिष्ठ महाविद्यालय).

याप्रसंगी परीक्षक म्हणून शिवराज देसाई, डॉ. गणेश मुडेगावकर, डॉ.एस.आर.नाईक यांच्यासह शिवराज पाटील, तानाजी घाडगे,सायबण्णा निंबर्गी, दत्तात्रय गुड्डेवाडी, संतोष पवार, बाबासाहेब सगर, डॉ.अविनाश जम्मा,रवींद्र बिराजदार, निनाद सपकाळ, निखिल काळे, संगीता म्हमाणे आदी उपस्थित होते. गौरव जुदगार,तेजश्री तळे,मल्लिकार्जुन पाटील, माधव जोशी, रुपाली पाटील,राज मळेवाडी यांनी स्पर्धेचे सूत्रसंचालन यांनी केले.